**महाराष्ट्र शासन**
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - 400 032.

दूरध्वनी क्र 022-22793051

Email ID : napu22.mhpds@gov.in

---

क्रमांक : अधापु- 2022/ प्र.क्र. 14/ना.पु.-22 दिनांक : 30 सप्टेंबर, 2022

प्रति

1. जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
2. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
3. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी,
4. अन्नधान्य वितरण अधिकारी (पुणे, नागपूर, सोलापूर),

**विषय :- प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांसाठी माहे ऑक्टोबर, 2022 ते डिसेंबर, 2022 या कालावधी करीता प्रतिसदस्य प्रतिमाह 5 किलो अन्नधान्य "मोफत" वितरीत करण्यासाठी अतिरिक्त नियतन**

**संदर्भ :-** 1) केंद्र शासन आदेश क्र. F.No.7-1/2019-BP.III (Pt) (e-371225), दि. 29.09.2022
2) शासन निर्णय क्र. असुका-2021/प्र.क्र.66/नापु-22, दि. 18.2.2022
3) शासन पत्र क्र. अधापु-2022/प्र.क्र.8/नापु-22, दि. 28.2.2022

केंद्र शासनाने संदर्भाधीन दि. 29.09.2022 च्या आदेशान्वये देशातील Corona Virus (Covid-19) च्या प्रादुर्भावामुळे आलेल्या आर्थिक व्यत्ययामुळे गरीबांना सामोरे जावे लागत असलेल्या कठीण प्रसंगाच्या पार्श्वभुमीवर प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांसाठी **ऑक्टोबर, 2022 ते डिसेंबर, 2022** करीता राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याव्यतिरिक्त प्रतिसदस्य प्रतिमाह 5 किलो अन्नधान्य **"मोफत"** वितरीत करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशानुसार प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांना प्रतिसदस्य प्रतिमाह 5 किलो अन्नधान्य त्याचप्रमाणे अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये शिधापत्रिकेतील नोंदीनुसार प्रत्यक्ष असलेल्या सदस्यांनादेखील प्रतिसदस्य प्रतिमाह 5 किलो याच परिमाणात **"मोफत"** अन्नधान्य वितरीत करावयाचे आहे.

2. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दि. 29.09.2022 च्या पत्रान्वये सदर लाभार्थ्यांसाठी अन्नधान्याचे (गहू व तांदूळ) नियतन प्राप्त झाले आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या नियतनाच्या मर्यादेत लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत पात्र लाभार्थ्यांसाठी **माहे ऑक्टोबर, 2022 ते डिसेंबर, 2022** करिता याद्वारे अन्नधान्याचे (गहू व तांदूळ) नियतन मंजूर करण्यात येत आहे. अंत्योदय अन्न योजनेच्या

लाभार्थ्यांसाठी व प्राधान्य कुटुं लाभार्थ्यांसाठी जिल्हानिहाय मासिक नियतनाचा तपशील अनुक्रमे सोबतच्या विवरणपत्र “अ” व विवरणपत्र “ब” मध्ये दर्शविण्यात आला आहे. त्यानुसार भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून आवश्यक अन्नधान्याची उचल करावी.

3. केंद्र शासनाच्या उपरोक्त पत्रानुसार माहे ऑक्टोबर, 2022 व नोव्हेंबर, 2022 साठी वितरीत करावयाच्या अन्नधान्याच्या उचलीची मुदत दि. 31 ऑक्टोबर, 2022 पर्यंत असेल. तसेच, माहे डिसेंबर, 2022 करिताच्या अन्नधान्याच्या उचलीची मुदत लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील मुदतीप्रमाणे म्हणजेच नियतन महिन्याच्या आधीच्या महिन्यातील शेवटच्या दिनांकापर्यंत राहील. जर भारतीय अन्न महामंडळाकडील अन्नधान्याच्या उपलब्धतेनुसार सदर अन्नधान्याची उचल उपरोक्त मुदतीपूर्वीदेखील करता येईल.

सदर अतिरिक्त अन्नधान्याच्या उचलीस मुदतवाढ मिळणार नाही. विहीत कालावधीत अन्नधान्याची उचल करण्यास कसूर केल्यास संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी/उपनियंत्रक यांच्यावर कामात कुचराई केल्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी.

4. सदर अन्नधान्य हे राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या अन्नधान्याव्यतिरिक्त उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सर्व पात्र लाभार्थ्यांमध्ये त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अन्नधान्याबाबत जागरुकता निर्माण व्हावी, याकरिता सदर अतिरिक्त अन्नधान्याबाबत व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच, प्रस्तुत योजनेचा लाभ घेता यावा याकरिता “एक देश, एक शिधापत्रिका” योजनेंतर्गत पोर्टेबिलिटी सुविधेचा वापर करण्याबाबत राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत पात्र स्थलांतरीत लाभार्थांना प्रोत्साहीत करण्याकरिता विशेष प्रयत्न करण्यात यावे.

5. **सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या परिमाणात माहे ऑक्टोबर, 2022 ते डिसेंबर, 2022 करिता अन्नधान्याचे मोफत वाटप त्या-त्या महिन्यात करावे.** केंद्र शासनाच्या उपरोक्त पत्रान्वये प्राप्त झालेल्या नियतनातील गहू व तांदळाच्या मर्यादेत जिल्हानिहाय नियतन देणे अपरिहार्य असल्याने त्याप्रमाणे अन्नधान्याचे परिमाण निश्चित करण्यात आले आले आहे. सबब, गहू व तांदळाच्या परिमाणात बदल करण्याची कोणतीही विनंती विचारात घेतली जाणार नाही.

6. अंत्योदय अन्न योजना कुटुंबांतील सदस्यांनादेखील प्रतिसदस्य प्रतिमाह 5 किलो याच परिमाणात मोफत अन्नधान्य वितरीत करावयाचे आहे. **उदा. अंत्योदय अन्न योजना कुटुंबांतील लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या नियमित 35 किलो अन्नधान्याचे वितरण केल्यानंतर, सदर अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकेतील सदस्य संख्येनुसार प्रतिसदस्य 5 किलो अन्नधान्याचे (गहू व तांदूळ) मोफत वितरण करावयाचे आहे. म्हणजेच अंत्योदय अन्न योजना शिधापत्रिकेवर 1 सदस्य असल्यास 5 किलो, 2 सदस्य असल्यास 10 किलो याप्रमाणे अन्नधान्याचे (गहू व तांदूळ) मोफत वितरण करावयाचे आहे.**

प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांनादेखील राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेल्या 5 किलो प्रति सदस्य या परिमाणात अन्नधान्य वितरण केल्यानंतर प्रति सदस्य 5 किलो अन्नधान्याचे (गहू व तांदूळ) मोफत वितरण करावयाचे आहे.

7. उपरोक्त अन्नधान्याचे वितरण करताना रास्तभाव दुकानदारांनी e PoS द्वारे अन्नधान्य वितरीत करणे अनिवार्य राहील.

8. शासनाचे सदर नियतन मंजूरीचे आदेश उपआयुक्त (पुरवठा) व इतर सर्व संबंधितांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले आहेत. परंतु सदर नियतन आदेश इतर वरीष्ठांकडून प्राप्त न झाल्यामुळे अन्नधान्याची विहित मुदतीत उचल करता आली नाही व त्यामुळे नियतन व्यपगत झाले, ही सबब विचारात घेतली जाणार नाही व याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

9. भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून अन्नधान्य स्विकारताना शासनाच्या निर्देशानुसार नमुने घेऊन संयुक्तपणे अन्नधान्याचा दर्जा तपासून तो समाधानकारक असल्याची खात्री करुनच अन्नधान्याची उचल करण्यात यावी. यासंबंधी शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच सदर संयुक्त तपासणीच्या वेळी उपस्थित असलेल्या भारतीय अन्न महामंडळाच्या व शासनाच्या प्रतिनिधींची नावे, त्यांचे पद व तपासणीचा दिनांक व स्थळ याबाबतची जिल्हानिहाय माहिती अन्नधान्याची उचल पूर्ण झाल्यानंतर तत्काळ शासनास सादर करावी. सदर माहिती पुढील महिन्याच्या शासनाच्या नियतन आदेशापूर्वी प्राप्त न झाल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

10. शिधापत्रिकाधारकास रास्तभाव दुकानांच्या माध्यमातून सदर अन्नधान्याचे वाटप विहित परिमाणात होत असल्याची खातरजमा करण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात. अन्नधान्याचे वाटप होत नसल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

11. सार्वजनिक वितरण व्यवस्था नियंत्रण आदेश, 2015 मधील तरतूदीनुसार उपरोक्त अन्नधान्याच्या नियतनाचे "उपयोगिता प्रमाणपत्र" सादर करणे अनिवार्य आहे.

12. **माहे ऑक्टोबर, 2022 ते डिसेंबर, 2022** साठी अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यांकरीता अतिरिक्त नियतनानुसार अन्नधान्याचा साठा मुक्त करण्याच्या सूचना भारतीय अन्न महामंडळास स्वतंत्र पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

Signed by Mahesh Saral Jadhav
Date: 30-09-2022 19:09:15
Reason: Approved

**(महेश जाधव)**
**कक्ष अधिकारी**

**सोबत:- विवरणपत्र "अ" व "ब"**

प्रत:-
1) सर्व उप आयुक्त (पुरवठा)
2) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई
3) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.
( केंद्र शासनाच्या दि. 29.09.2022 च्या पत्रासह)
4) संगणक कक्ष, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई, यांना PoS मशीनमध्ये योग्य ते जिल्हानिहाय परिमाण (Policy) नमूद करण्याकरीता रवाना.
5) कक्ष अधिकारी ,नापु-29 अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई, यांना उचित कार्यवाहीकरिता

6) निवडनस्ती :- नापु-22

| विवरणपत्र "अ" | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शासन पत्र क्र. अधापु- २०२२/प्र.क्र. १४/नापु-२२, दि. ३०.०९.२०२२ सोबतचे विवरणपत्र "अ" | | | | | | | | |
| प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत "अंत्योदय अन्न योजने" तील लाभार्थ्यांसाठी माहे ऑक्टोबर, २०२२ ते डिसेंबर, २०२२ करिता अन्नधान्याचे सुधारीत मासिक नियतन | | | | | | | | |
| अ.क्र | जिल्हा | कार्डसंख्या | लाभार्थी सदस्यसंख्या | मासिक नियतनाचे परिमाण | | मासिक नियतन (मे.टन) | | |
| | | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | मासिक एकूण अन्नधान्य |
| A | B | C | D | E | F | G | H | I |
| 1 | A Region | 1013 | 3908 | 1 | 4 | 4 | 16 | 20 |
| | D Region | 310 | 915 | 1 | 4 | 1 | 4 | 5 |
| | E Region | 2271 | 7769 | 1 | 4 | 8 | 31 | 39 |
| | F Region | 12887 | 48370 | 1 | 4 | 48 | 193 | 241 |
| | G Region | 2031 | 7417 | 1 | 4 | 7 | 30 | 37 |
| MTRA TOTAL | | 18512 | 68380 | | | 68 | 274 | 342 |
| 2 | ठाणे | 50005 | 192033 | 1 | 4 | 192 | 768 | 960 |
| 3 | पालघर | 96890 | 484211 | 1 | 4 | 484 | 1937 | 2421 |
| 4 | रायगड | 84774 | 279028 | 1 | 4 | 279 | 1116 | 1395 |
| 5 | रत्नागिरी | 39899 | 140333 | 1 | 4 | 140 | 561 | 701 |
| 6 | सिंधुदुर्ग | 22148 | 79156 | 1 | 4 | 79 | 317 | 396 |
| 7 | नाशिक | 178563 | 863747 | 1 | 4 | 864 | 3455 | 4319 |
| 8 | धुळे | 76165 | 388687 | 1 | 4 | 389 | 1555 | 1944 |
| 9 | जळगांव | 135192 | 630860 | 1 | 4 | 631 | 2523 | 3154 |
| 10 | नंदूरबार | 106857 | 537792 | 1 | 4 | 538 | 2151 | 2689 |
| 11 | अहमदनगर | 89965 | 439895 | 1 | 4 | 440 | 1760 | 2200 |
| 12 | पुणे ग्रामीण | 50300 | 212471 | 2 | 3 | 425 | 637 | 1062 |
| 13 | पुणे शहर | 8255 | 30875 | 1 | 4 | 31 | 124 | 155 |
| 14 | सोलापूर ग्रामीण | 55851 | 241685 | 1 | 4 | 242 | 967 | 1209 |
| 15 | सोलापूर शहर | 6310 | 25308 | 2 | 3 | 51 | 76 | 127 |
| 16 | कोल्हापूर | 54095 | 233728 | 2 | 3 | 467 | 701 | 1168 |
| 17 | सांगली | 31908 | 127774 | 2 | 3 | 255 | 384 | 639 |
| 18 | सातारा | 28601 | 129665 | 2 | 3 | 259 | 389 | 648 |
| 19 | औरंगाबाद | 66195 | 311832 | 2 | 3 | 623 | 936 | 1559 |
| 20 | जालना | 44443 | 215285 | 2 | 3 | 430 | 646 | 1076 |
| 21 | नांदेड | 81609 | 340254 | 2 | 3 | 680 | 1021 | 1701 |
| 22 | बीड | 40080 | 163279 | 2 | 3 | 326 | 491 | 817 |
| 23 | उस्मानाबाद | 39623 | 196065 | 2 | 3 | 392 | 588 | 980 |
| 24 | परभणी | 44895 | 185349 | 2 | 3 | 370 | 557 | 927 |
| 25 | लातूर | 42787 | 216474 | 2 | 3 | 433 | 649 | 1082 |
| 26 | हिंगोली | 30307 | 140005 | 2 | 3 | 280 | 420 | 700 |
| 27 | अमरावती | 125632 | 467939 | 1 | 4 | 468 | 1872 | 2340 |
| 28 | वाशिम | 49372 | 207144 | 2 | 3 | 414 | 621 | 1035 |
| 29 | अकोला | 44753 | 167366 | 1 | 4 | 167 | 669 | 836 |
| 30 | बुलढाणा | 64292 | 298578 | 1 | 4 | 298 | 1194 | 1492 |
| 31 | यवतमाळ | 132603 | 522347 | 1 | 4 | 522 | 2089 | 2611 |
| 32 | नागपूर ग्रामीण | 79053 | 321876 | 1 | 4 | 322 | 1288 | 1610 |
| 33 | नागपूर शहर | 45874 | 195005 | 1 | 4 | 195 | 780 | 975 |
| 34 | वर्धा | 49058 | 180805 | 1 | 4 | 181 | 723 | 904 |
| 35 | भंडारा | 66584 | 270929 | 1 | 4 | 271 | 1084 | 1355 |
| 36 | गोंदिया | 80891 | 350149 | 1 | 4 | 350 | 1401 | 1751 |
| 37 | चंद्रपूर | 140621 | 524779 | 1 | 4 | 525 | 2099 | 2624 |
| 38 | गडचिरोली | 102338 | 419562 | 1 | 4 | 419 | 1679 | 2098 |
| राज्याची एकूण | | **2505300** | **10800652** | | | **13500** | **40502** | **54002** |

# विवरणपत्र "ब"

शासन पत्र क्र. अधापु- २०२२/प्र.क्र. १४/नापु-२२, दि. ३०.०९.२०२२ सोबतचे विवरणपत्र "ब"

प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत "प्राधान्य कुटुंबातील लाभार्थ्यां" साठी माहे ऑक्टोबर, २०२२ ते डिसेंबर, २०२२ करिता सुधारीत मासिक नियतन

| अ.क्र | जिल्हा | लाभार्थी सदस्यसंख्या | मासिक नियतनाचे परिमाण | | मासिक नियतन (मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदूळ | गहू | तांदूळ | एकूण मासिक अन्नधान्य |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | A Region | **721136** | 2 | 3 | 1442 | 2164 | 3606 |
| | D Region | **1000145** | 2 | 3 | 2000 | 3001 | 5001 |
| | E Region | **2236304** | 2 | 3 | 4472 | 6709 | 11181 |
| | F Region | **3027778** | 2 | 3 | 6055 | 9083 | 15138 |
| | G Region | **1174022** | 2 | 3 | 2348 | 3522 | 5870 |
| | MTRA TOTAL | | | | **16317** | **24479** | **40796** |
| 2 | ठाणे | **524555** | 1 | 4 | 524 | 2098 | 2622 |
| 3 | पालघर | **1495241** | 1 | 4 | 1495 | 5981 | 7476 |
| 4 | रायगड | **1528998** | 1 | 4 | 1529 | 6116 | 7645 |
| 5 | रत्नागिरी | **1020738** | 1 | 4 | 1021 | 4083 | 5104 |
| 6 | सिंधुदुर्ग | **577211** | 1 | 4 | 577 | 2309 | 2886 |
| 7 | नाशिक | **2980804** | 1 | 4 | 2981 | 11923 | 14904 |
| 8 | धुळे | **1150209** | 1 | 4 | 1150 | 4601 | 5751 |
| 9 | जळगांव | **2219690** | 1 | 4 | 2219 | 8879 | 11098 |
| 10 | नंदूरबार | **741360** | 1 | 4 | 741 | 2966 | 3707 |
| 11 | अहमदनगर | **2703501** | 1 | 4 | 2703 | 10814 | 13517 |
| 12 | पुणे ग्रामीण | **2558207** | 1 | 4 | 2558 | 10233 | 12791 |
| 13 | पुणे शहर | **1314283** | 1 | 4 | 1314 | 5257 | 6571 |
| 14 | सोलापूर ग्रामीण | **1745741** | 1 | 4 | 1745 | 6983 | 8728 |
| 15 | सोलापूर शहर | **508818** | 1 | 4 | 509 | 2035 | 2544 |
| 16 | कोल्हापूर | **2349056** | 1 | 4 | 2349 | 9396 | 11745 |
| 17 | सांगली | **1773059** | 2 | 3 | 3546 | 5319 | 8865 |
| 18 | सातारा | **1711722** | 1 | 4 | 1712 | 6847 | 8559 |
| 19 | औरंगाबाद | **1992847** | 1 | 4 | 1993 | 7971 | 9964 |
| 20 | जालना | **1348693** | 1 | 4 | 1348 | 5395 | 6743 |
| 21 | नांदेड | **1935770** | 1 | 4 | 1935 | 7743 | 9678 |
| 22 | बीड | **1506205** | 1 | 4 | 1506 | 6025 | 7531 |
| 23 | उस्मानाबाद | **997107** | 1 | 4 | 997 | 3989 | 4986 |
| 24 | परभणी | **1033574** | 1 | 4 | 1033 | 4134 | 5167 |
| 25 | लातूर | **1559647** | 1 | 4 | 1559 | 6239 | 7798 |
| 26 | हिंगोली | **732050** | 1 | 4 | 732 | 2928 | 3660 |
| 27 | अमरावती | **1408878** | 1 | 4 | 1409 | 5636 | 7045 |
| 28 | वाशिम | **771735** | 2 | 3 | 1543 | 2316 | 3859 |
| 29 | अकोला | **1104787** | 2 | 3 | 2209 | 3315 | 5524 |
| 30 | बुलढाणा | **1538699** | 2 | 3 | 3077 | 4616 | 7693 |
| 31 | यवतमाळ | **1469136** | 2 | 3 | 2938 | 4408 | 7346 |
| 32 | नागपूर ग्रामीण | **1383943** | 1 | 4 | 1384 | 5537 | 6921 |
| 33 | नागपूर शहर | **1469374** | 1 | 4 | 1469 | 5879 | 7348 |
| 34 | वर्धा | **924445** | 1 | 4 | 924 | 3699 | 4623 |
| 35 | भंडारा | **749894** | 1 | 4 | 749 | 3001 | 3750 |
| 36 | गोंदिया | **694560** | 1 | 4 | 694 | 2779 | 3473 |
| 37 | चंद्रपूर | **1074240** | 1 | 4 | 1074 | 4298 | 5372 |
| 38 | गडचिरोली | **457869** | 1 | 4 | 457 | 1833 | 2290 |
| राज्याची एकूण | | **59216031** | | | **74020** | **222060** | **296080** |

**Government of Maharashtra**
Food, Civil Supplies & Consumer Protection Department,
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk,,
Mantralay Annex, Mumbai-400 032

Telephone: 022-22793051

Email ID : napu22.mhpds@gov.in

---

No.- ADHAPU-2022/C.R.14/CS-22 Date :- 30th September, 2022

To,

The General Manager (Mah),
Food Corporation of India, Regional Office (Maharashtra),
FSD Complex, Dattapada Road, Rajendra Nagar,
Borivali (E), Mumbai- 400 066.

**Sub: -** PRADHAN MANTRI GARIB KALYAN ANNA YOJANA-Phase-VII
Monthly Allocation of Additional Foodgrains for distribution to all beneficiaries under TPDS @ 5Kg per person per month for a period of 3 months i.e. October, 2022 to December, 2022

**Ref: -** 1) Govt. of India letter No. F.No.7-1/2019-BP.III (Pt) (e-371225), dated:- 29.09.2022
2) State Govt. Letter of even no. Dtd. 30.09.2022

Sir,

Government of India vide its above referred letter dated 29.09.2022 has sanctioned Monthly Allocation of Additional Foodgrains for distribution to all beneficiaries under TPDS (AAY & PHH) @ 5Kg per person per month for a period of 3 months i.e. October, 2022 to December, 2022. Accordingly, the State Government has issued district wise allocation for the said period vide above referred letter dated 30th September, 2022. (Copy enclosed).

You are therefore requested to release the allocated quota of Wheat & Rice for Priority households & AAY category to the nominees of District Collector's and Controller of Rationing, Director, Civil Supplies, Mumbai as per the statement attached under intimation to this Government.

Yours faithfully,

Signed by Mahesh Saral Jadhav
Date: 30-09-2022 19:02:31
Reason: Approved

(Mahesh Jadhav)
Section Officer

Copy to:1) Financial Advisor & Deputy Secretary, F.C.S & C.P. Dept, Mumbai.

2) Select file, Desk CS-22.